# निवडणूक महापालिकेची अन् 'परीक्षा' नव्या आमदारांची!

**गणेश पाटील**

## भाजपाला बहुजन विकास आघाडीचे कडवे आव्हान







**विरार :** वसई-विरार महापालिकेच्या सभागृहात १०५ एवढ्या बहुमतात असणाऱ्या बहुजन विकास आघाडीच्या हाती आता पुन्हा महापालिकेच्या सत्तेची चावी लागू नये, यासाठी आगामी महापालिका निवडणुक भाजपासाठी प्रतिष्ठेची आणि दोन आमदारांची "परीक्षा" घेणारी ठरणार आहे.

वसई आणि नालासोपारा बहुजन विकास आघाडीच्या या दोन विधानसभा मतदारसंघाला सुरुंग लावल्यानंतर वसई-विरार महापालिकेवर सुद्धा महायुतीचा झेंडा फडकवला जावा यासाठी भाजपाच्या कार्यकर्त्यांपासून प्रदेश कार्याध्यक्ष, अध्यक्ष सर्वांचीच मनिषा आहे. त्या दृष्टीने संघटनशक्ती वाढविण्याकरिता प्रदेश कार्याध्यक्ष आ. रवींद्र चव्हाण यांच्याकडून अधूनमधून सर्व पदाधिकाऱ्यांना आवश्यक "डोज" दिले जातात. दरम्यान, वसई-विरार महापालिका २००९ मध्ये अस्तित्वात आली असून, या महापालिकेच्या २ सार्वत्रिक निवडणुका झाल्या आहेत. २०१५ मध्ये झालेल्या निवडणुकीत ११५ सदस्य संख्या असलेल्या महापालिकेच्या सभागृहात बहुजन विकास आघाडीचे १०५ नगरसेवक पोहचले, तर भारतीय जनता पक्षाला एका नगरसेवकाच्या माध्यमातून केवळ खाते उघडता आले. गेल्या वर्षी झालेल्या विधानसभा निवडणुकीत मात्र महायुतीने चांगले यश मिळवले असून, वसई आणि नालासोपारा या दोन मतदारसंघात बहुजन विकास आघाडीचे सर्वेसर्वा माजी आमदार हितेंद्र ठाकूर आणि त्यांचे चिरंजीव क्षितिज ठाकूर यांचा पराभव करण्यात आला. स्नेहा दुबे पंडित आणि राजन नाईक हे नवे चेहरे आमदार झाले असून, या दोन मतदारसंघात भाजपाचा विजय झाला. विधानसभेच्या निवडणुकीनंतर कार्यकर्त्यांचे बळ वाढविण्यासाठी वसई आणि नालासोपारा दोन्ही मतदारसंघात पदाधिकाऱ्यांचे "इन्कमिंग" वाढविण्याचे प्रयत्न दोन्ही आमदारांकडून करण्यात येत आहेत. वसई-विरारमधील भाजपाचे १२ मंडळ अध्यक्ष निवडताना आगामी महापालिका निवडणूक लक्षात घेऊन मंडळ अध्यक्ष ठरविण्यात आले. त्यामुळे महापालिकेच्या निवडणुकीत भाजपाला चांगले यश मिळावे असे सर्व भाजपा समर्थकांना वाटत असले तरी बहुजन विकास आघाडीचा महापालिकेचा गड भेदने एवढे सोपे नाही.

जागतिक महिला दिन, गुढीपाडवा, रमजान ईद यासारखे अनेक महत्वाचे छोटेमोठे सण उत्सव, युवकांच्या स्पर्धा हजारो कार्यकर्त्यांच्या गोतावळ्यात साजऱ्या करून बहुजन विकास आघाडीने सामान्य कार्यकर्त्यांमध्ये पुन्हा एकदा नवा दम भरला आहे. प्रत्येक प्रभागात माजी नगरसेवक आणि पदाधिकारी मोर्चेबांधणीला लागले आहेत. महापालिका प्रशासनातील अधिकाऱ्यांसोबत असलेले "सख्य" सामान्य कार्यकर्त्यांच्या कामासाठी वापरले जात आहे. त्यामुळे महापालिका निवडणुकीत पुन्हा एकदा बहुजन विकास आघाडीची "शिट्टी" वाजविण्यासाठी आघाडीचे पदाधिकारी तयार आहेत. अशातच भाजपासाठी महापालिकेच्या सत्तेची दारे उघण्याकरिता भाजपाच्या दोन आमदारांना त्यांच्या विधानसभा मतदारसंघाच्या (१३२,१३३) या क्रमांकाच्या किमान निम्मे संख्ये एवढी नगरसेवकांची संख्या लागणार आहे. परिणामी लवकरच होणाऱ्या महापालिका निवडणुकीच्या परीक्षेत बहुजन विकास आघाडीची "शिट्टी" वाजते की भाजपाचे "कमळ" फुलते हे लवकरच कळणार आहे.

## 'गावदेवी तारपा कला पथक' साखरशेतचा कार्निव्हलमध्ये घडला गौरव

### आदिवासी परंपरेचे दर्शन घडवणारा महोत्सवातील खास आकर्षण

◆ **जव्हार (प्रतिनिधी) :**




रोटरी क्लब ऑफ न्यू कल्याणच्या वतीने कल्याण (पूर्व) येथील यशवंतराव चव्हाण मैदान, मॅक्सी ग्राऊंड, रामबाग येथे दोन दिवसीय 'कला कार्निव्हल' या भव्य वस्तू प्रदर्शन व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या रंगतदार कार्यक्रमात आदिवासी संस्कृतीचे प्रतिक ठरलेल्या तारपा नृत्य सादरीकरणासाठी जव्हार तालुक्यातील साखरशेत येथील गावदेवी तारपा कला पथकाला निमंत्रित करण्यात आले होते.या तारपा नृत्य सादरीकरणाने कार्यक्रमात उपस्थित असलेल्या नागरिकांचे, पाहुण्यांचे तसेच आयोजकांचेही मन जिंकले. पारंपरिक आदिवासी पोशाख, तालबद्ध चाली आणि आदिवासी परंपरेचे दर्शन घडवणारा तारपा नृत्य हा या महोत्सवातील एक खास आकर्षण ठरला.

सदर कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून पद्मश्री अच्युत पालव आणि कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे आयुक्त अभिनव गोयल यांची उपस्थिती लाभली. त्यांच्या हस्ते पथकप्रमुख मनोज कामडी यांच्यासह तारपा वादक व नृत्यकलाकारांचा सत्कार करण्यात आला. या महत्त्वाच्या संधीसाठी रोटरी क्लब ऑफ न्यू कल्याणचे सदस्य आणि जव्हारचेच रहिवासी श्री. उमेश मुकणे यांनी विशेष पुढाकार घेतला. त्यांच्या माध्यमातून आदिवासी कलाकारांना आपली कला मोठ्या व्यासपीठावर सादर करण्याची संधी मिळाली. कार्यक्रमास रोटरी क्लब ऑफ न्यू कल्याणचे अध्यक्ष बिजू उन्नीनाथन, कार्यक्रमचे प्रोजेक्ट चेयर कैलास देशपांडे, क्लब सचिव रमेश मोरे व इतर सर्व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांनी साखरशेत तारपा पथकाच्या कार्याची स्तुती करत भविष्यातही अशा कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी आग्रह व्यक्त केला.ही सादरीकरणे आदिवासी संस्कृतीचे जतन व संवर्धन करण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची ठरत असून, अशा उपक्रमांतून आदिवासी तरुणांना एक नवे व्यासपीठ आणि प्रेरणा मिळत आहे.

## कोगदे गावाचे डॉ. अजय डोके बनले आयएएस अधिकारी



**जव्हार (वार्ताहर) :** पालघर जिल्ह्यातील जव्हार तालुक्यातील अतिदुर्गम कोगदे गावातील डॉ. अजय काशीराम डोके यांनी केंद्रीय लोकसेवा आयोग (यूपीएससी) परीक्षा यशस्वीपणे उत्तीर्ण करून भारतीय प्रशासकीय सेवा (आयएएस) मध्ये प्रवेश मिळवला आहे. विशेष म्हणजे, ते कोकण विभागातून आयएएस होणारे पहिले आदिवासी, तर संपूर्ण महाराष्ट्रातून आदिवासी समाजातून तिसरे आयएएस अधिकारी ठरले आहेत. या अभूतपूर्व यशाच्या निमित्ताने कोगदे गावात भव्य मिरवणूक आणि सत्कार करण्यात आला.

पारंपरिक आदिवासी वाद्यांचे निनाद, सांबळीच्या गजरात गावकऱ्यांनी डॉ. डोके, त्यांचे पालक, तसेच गुरू सुरेश भोये यांचे जल्लोषात स्वागत केले. यावेळी डॉ. अजय डोके यांच्या हस्ते गावातील दहावी, बारावी, नवोदय व शिष्यवृत्ती परीक्षांत यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच कै. पांडुरंग त्रिंबक घेगड वाचनालयाचे उद्घाटनही डॉ. डोके यांच्या हस्ते पार पडले.

## नागरिकांच्या जीवाशी खेळ; कंपन्यांविरुद्ध कारवाई केव्हा ?

◆ **पालघर (प्रतिनिधी) :**




रबर टायरचे पायरोलिसिस करण्याच्या नावाखाली उभ्या झालेल्या अनेक कारखान्यांकडून प्रदूषण नियंत्रण मंडळाने आखून दिलेल्या नियमावलीत काम केले जात नाही. त्यामुळे अशा कारखान्यांजवळच्या ग्रामस्थांना विविध समस्यांचा सामना करावा लागत आहे. पालकमंत्र्यांच्या आदेशानंतर वाडा तालुक्यातील सर्वच पायरोलिसीस कंपन्यांची तपासणी करण्यात आली असून, दोषी कारखानदारांविरुद्ध मात्र अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.

परदेशातून येणाऱ्या टायरचे विशिष्ट वातावरणात विघटन करून त्यापासून पायरो ऑइल, कार्बन ब्लॅक तसेच स्टीलचे उत्पादन घेतले जाते. वाडा तालुक्यातील उसर, दिनकरपाडा, वडवली, बिलोशी, पालसई, सापना, किरवली, नेहरोली, कोन, तोरणे कोणसई या गावांमध्ये ६० हून अधिक पायरॉलिसिसचे कारखाने आहेत. दरम्यान, हवेत मिसळणारे कार्बन फाईन रोखण्यासाठी आवश्यक स्क्रबर व प्रदूषण नियंत्रक यंत्रणेचा वापर काही कारखान्यांकडून केला जात नाही. त्यामुळे याचा परिणाम परिसरातील नागरिकांच्या आरोग्यावर होत असल्याचा आरोप केला जात आहे. श्वसनाच्या त्रासासोबतच अनेक नागरिकांना या कंपन्यांमधील प्रदूषित धुरामुळे त्वचा रोगाचा सामना करावा लागत आहे. सदर कारखाने लोकवस्ती पासून किमान ५०० मीटर दूर असणे आवश्यक आहे, मात्र काही कारखाने लोकवस्तीच्या दोनशे तीनशे मीटर अंतरावरच असल्याचा सुद्धा नागरिकांचा आरोप आहे. या प्रकाराबाबत ग्रामस्थांनी तसेच संघटनांनी जनता दरबारामध्ये पालकमंत्री गणेश नाईक यांच्याकडे तक्रार केली. यावेळी पालकमंत्र्यांनी प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांना विचारणा केली असता नियमानुसार काम न करणाऱ्या ३३ कंपन्याविरुद्ध प्रदूषण नियंत्रण मंडळाने यापूर्वी कारवाई केल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. शेतकरी व ग्रामस्थांच्या तक्रारी असल्याने संबंधित सर्व कारखान्यांची तपासणी करून योग्य कारवाई करण्याचे निर्देश पालकमंत्री नाईक यांनी दिले आहेत. त्यानुसार प्रदूषण नियंत्रण मंडळ कल्याण ३ च्या चार 'फील्ड ऑफिसर'कडून सर्वच कंपन्यांमध्ये एप्रिल महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून १२ दिवस तपासणी मोहीम राबविण्यात आली. तपासणी पूर्ण करीत, फिल्ड ऑफिसर यांच्याकडून प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयाला अहवाल सादर करण्यात आला आहे.

### १५ दिवसांत तपासणी; कारवाईला विलंब

पालकमंत्री गणेश नाईक यांनी आदेश दिल्यावर पंधरा दिवसानंतर फील्ड ऑफिसर यांच्याकडून संबंधित सर्वच कंपन्यांमध्ये तपासणी करीत आली. १०ते १२ दिवसांत तपासणी करून अहवाल सुद्धा सादर करण्यात आले आहेत. या अहवालानुसार दोषी आढळणाऱ्या कंपन्यांविरुद्ध कारवाई मात्र अद्याप करण्यात आली नाही. त्यामुळे आश्चर्य व्यक्त केला जात आहे.



वसई-विरार महापालिका क्षेत्रातील धोकादायक वृक्ष छाटणीचे काम महापालिकेकडून सर्वत्र करण्यात येत आहे. वृक्ष छाटणीचे काम करणाऱ्या मजुरांना हेल्मेट किंवा तत्सम सुरक्षेची साधने उपलब्ध करून देण्यात येत नाहीत. त्यामुळे संबंधित मजुरांच्या जीवाशी खेळ सुरू आहे.

## भारतीय सैन्याचे शौर्य संपूर्ण देशासाठी अभिमानास्पद



◆ **पालघर (प्रतिनिधी) :**

पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर भारतीय सैनिकांनी पाकिस्तानला प्रत्युत्तर दिले. हे भारतीय सैन्याचे शौर्य संपूर्ण देशासाठी अभिमानास्पद असल्याचे प्रतिपादन वनमंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक यांनी केले.

सामर्थ्यवान भारतीय सैन्याचे कौतुक करण्यासाठी पालघर येथे शनिवारी तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. पालकमंत्री गणेश नाईक खासदार डॉ. हेमंत सवरा, आमदार हरिश्चंद्र भोये, भरत राजपूत आदी तिरंगा रॅलीत सहभागी झाले होते. संपूर्ण जग भारतीय सैन्याच्या शौर्याचे कौतुक करत असल्याचे पालकमंत्र्यांनी सांगितले.

## हायवाच्या धडकेत वृद्धाचा मृत्यू

◆ **वाडा (वार्ताहर) :**




वाड्याच्या दिशेने भरधाव वेगाने येणाऱ्या हायवा ट्रकने धडक दिल्याने जनार्दन पांडुरंग आकरे (वय ७७) यांचा जागीच मृत्यू झाला आहे. ते इंदगाव येथील रहिवासी होते. वाडा तालुक्यातील कंचाड येथे रविवारी (दि. १८) आठवडा बाजार भरत असून आकरे हे कोयत्याला धार लावून आणण्यासाठी गेले होते.

तेथून ते घराकडे परत फिरले असता कंचाडपासून काही अंतरावर आले असता मागून येणाऱ्या हायवा ट्रकने धडक दिल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला असल्याची माहिती त्याच्या परिचितांनी दिली आहे. अपघात झाल्यानंतर गोऱ्हा फाटा येथून वाहन घेऊन पळून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या हायवा चालकाला नागरिकांनी वावेघर येथे गाठून वाहन चालक नरेश श्याम बिहारी यास पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. तर वाडा पोलिसांनी हायवा ट्रक जप्त केला आहे.

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

सार्वजनिक आरोग्य विभाग

निविदा सुचना

ठाणे महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत Turn key of Advance X Ray & Retrofit Panel with Printer करीता ऑनलाईन ई-टेंडरींग पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहे. निविदा सूचना व प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळावर https:// mahatenders.gov.in दि.१९/०५/२०२५ ते दि.३०/०५/२०२५ पर्यत सकाळी ११.०० वाजेपर्यत उपलब्ध होतील. दि.३०/०५/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यत ऑनलाईन निविदा स्विकारण्यात येतील. दि. ३०/०५/२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता स्विकारलेल्या निविदा ऑनलाईन उघडण्यात येतील. सर्व निविदा किंवा काही निविदा स्विकारण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार ठाणे महानगरपालिका स्वत: कडे राखून ठेवत आहे.

ठामपा/पिआरओ/आरोग्य/२४२/२०२५-२६
दि:१६.०५.२०२५

सही/-
वैद्यकीय आरोग्य अधिकारी
ठाणे महानगरपालिका, ठाणे

**Pls visit our oficial web-site www.thanecity.gov.in**

**उज्जीवन स्मॉल फायनांस बँक**

UJJIVAN SMALL FINANCE BANK

नोंदणीकृत कार्यालयः ग्रेप गार्डन, क्र. २७, ३ रा 'ए' क्रॉस, १८ वा मेन, ६ वा ब्लॉक, कोरामंगलम बेंगळूरू - ५६००९५, कर्नाटक
क्षेत्रिय कार्यालयः ७ वा मजला, अलमोन्टे आयटी पार्क, सर्वे क्र. ८ खराडी-मुंढवा बायपास, गाव खराडी, पुणे ४११०१४.

**जाहीर लिलाव सूचना**

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली २००२ च्या नियम ८(६) आणि ९ सह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल अॅसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, (सरफेसी कायदा) २००२ अंतर्गत विक्रीसाठी जाहीर सूचना**

उज्जीवन स्मॉल फायनांस बँक लि. चे अधिकृत अधिकारी म्हणून अधोस्वाक्षरीने, सरफेसी कायदा च्या कलम १३ (४) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा ताबा घेतला आहे. विशेषतः कर्जदारांना आणि सामान्य जनतेला सूचित करण्यात येते की बँकेच्या थकबाकीच्या वसुलीसाठी खाली नमूद केलेल्या खात्यातील तारण मालमत्तेचा सार्वजनिक लिलाव "जसा आहे तसाच आहे" आणि "जसा आहे तसाच आहे" या दिवशी केला जाईल.

| अनु. क्र | कर्ज खाते क्र./ शाखा | कर्जदार/ सह-कर्जदार/ हमीदार/ गहाणदारांचे नाव | १३ (२) सूचना दिनांक/ थकीत देणी (रु. मध्ये) अनुसार | ताब्याचा दिनांक | राखीव मूल्य आयएनआर मध्ये/ इरठे आयएनआरमध्ये |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 4462210180000002 / 4462- कामोठे | **१)पूपपांडियन सेल्ला थेवर** एस/ ओ सेल्ला थेवर, **२) मीनल पूपंडी** डब्ल्यू/ ओ पूपंडी, ३) पी **मारीश्वरम एस/ ओ पूपंडी,** सर्व येथे राहणारः शांतारांम नगर आर क्र. १७ साई अपार्टमेंट विटावा ठाणे-४००६०५. १) येथे देखीलः न्यू लक्ष्मी आर्ट, हॉऊस क्र. ३८२, गाला क्र.११ मजला, ईमा क्र. ए-२, जयराम कॉम्प्लेक्स काळवरगाव, भिवंडी, ठाणे, महाराष्ट्र-४२१३०२. आणि येथे देखील ३१, मंगलम, कडलाडी तालुक, कडलाडी, रामनाथपुरम, तामिळनाडू - ६२३७०३. २) आणि ३) येथे देखील १/३०७, मेला थेरु, कडलाई, कडलाडी, रामनाथपुरम, तामिळनाडू - ६२३७०३. | २५.१०.२०२३/ १९.१०.२०२३ अनुसार रु. १८,७४,३२३.९६/- | 17.01.2025 | Rs.38,79,000/- / Rs.3,87,900/- |
| | **स्थावर मालमत्तेचे वर्णनः** गाव वल, तालुका भिवंडी, जिल्हा ठाणे उप विभाग आणि उप नोंदणीकरण कार्यालय भिवंडी आणि विभाग आणि जिल्हा ठाणे आणि जिल्हा परिषद ठाणे येथे वसलेल्या जमिनीचा धारण केलेला एस क्र. ७१, एच क्र. १/४ वर बांधण्यात आलेल्या "प्रीतेश कॉंप्लेक्स" वल येथील इमारत क्र. बी-९ च्या दुसऱ्या मजल्यावरील साधारणपणे २१५५ चौ. फू. बिल्टअप क्षेत्रफळ जे २००.२८ चौ. मी. किंवा साधारणपणे तितक्याच असलेल्या धारण केलेला प्रस्तावित गाळा क्र. २०९ चे प्रस्तावित बांधकामाच्या एफ.एस.आय. अधिकारांसह सर्व खंड आणि भूखंड. पूप्पांडीयान ह्यांच्या नावे असलेले. | | | | |
| 2 | 4412210090000023 / 4412- ठाणे | १) मे बाबूराव हरिभाऊ थोरवे आणि कं, येथे राहणारः एन-९७३, एपीएमव्ही मार्केट, फ्रूट सेक्टर. सेक्टर-१९, तुर्भे , नवी मुंबई-४००७०५. **२) श्री. प्रशांत उल्हास थोरवे, ३) श्रीमती. आशा प्रशांत थोरवे,** दोघेही येथे राहणार महाराज ईमारत, १ ला मजला रूम क्र.९, ४५/४९, बोरा-बाजार स्ट्रीट, भाटिया बाग, जी. पी.ओ. समोर., फोर्ट, मुंबई-४००००१. | २५.११.२०२२/ २३.११.२०२२ अनुसार रु. ३८,१९,५९३.६८ | 07.12.2024 | Rs.1,21,50,000 / Rs.12,15,000/- |
| | स्थावर मालमत्तेचे वर्णनः गाव तुर्भे तालुका आणि जिल्हा ठाणे येथे वसलेल्या जमिनीचा ज्ञात असलेला प्लॉट क्र. ३ आणि ७, सेक्टर १९, वाशी नोड नवी मुंबई गट क्र. ७९६ पैकी वर असलेल्या एपीएमसी फ्रुट मार्केट ब्लॉक एनमधील २८.१२५ चौ. मी. म्हणजेच ३०० चौ. फू. मोजमाप असलेला लहान फ्रुट गाळा क्र. ९७३, ज्यापैकी तळ मजल्यावर २०० चौ. फू. आणि पहिल्या मजल्यावरील १०० चौ. फू. ची सर्व जागा. सीमा पुढील प्रमाणे : उत्तर : गाळा क्र. एन-९७८; दक्षिणः गाळा क्र. एन - ९६८; गाळा क्र. एन- ९७४; पश्चिमः गाळा क्र. एन - ९७२ | | | | |
| 3 | 4416210180000003 / 4416- कल्याण | **१)श्री. शेवक उधवदास वाधवा, २) श्रीमती अंजली शेवक वाधवा,** दोघेही येथे राहणार सदनिका क्र. ३०२, रिजन्सी गॅलेक्सी, गांधी रोड, उल्हासनगर ५, उल्हासनगर , ठाणे-४२१००५ | ०४.०८.२०२२/ ११.०७.२०२२ अनुसार रु. ३७,७१,५७७.९१/- | 25.02.2025 | Rs.40,03,000/- / Rs.4,00,300/- |
| | स्थावर मालमत्तेचे वर्णनः गाव उल्हासनगर ५ तालुका उल्हासनगर, जिल्हा ठाणे, उल्हासनगर महानगरपालिका हद्दीमध्ये वसलेल्या शीट क्र. ६६ चा यू. क्र. ६८ च्या भागाची सी. डी. होल्ड जमिनीचा धारण केलेला सी.टी.एस. क्र. २६८७४ चा भाग, खाता क्र. ५३/२१११ प्रभाग क्र. ५३, वर बांधण्यात आलेल्या "रिजेन्सी गॅलेक्सी" म्हणून ज्ञात असलेल्या इमारतीच्या ३ ऱ्या मजल्यावरील ५५६ चौ. फू. (बिल्टअप एरीया )मोजमापाची सदनिका क्र. ३०२. | | | | |
| 4 | 4416210150000002 & 4416210130000067 / 4416- कल्याण | **१) राजेंद्र दत्तात्रय व्यास, २) कविता राजेंद्र व्यास,** दोघेही येथे राहणार सदनिका क्र. ०५, तळ मजला, इमारत क्र. १, माऊली पार्क, तलाव रोड, द्वारका शाळेजवळ, कल्याण पूर्व, ठाणे – ४२१३०६ आणि येथे देखील : १/५ मा संतपोशी कॉलनी, शंकर पावशे रोड, हनुमान नगर, काटेमानिवली, कल्याण ठाणे ४२१३०६. १) येथे देखील : सी/ ओ पुराणिक बिल्डर्स लि., पुराणिक्स वन, कांचन पुष्पा कॉम्प्लेक्स, सुरज वॉटर पार्क समोर, कावेसर, घोडबंदर रोड, ठाणे ४००६०७ | ०४.०७.२०२२ / ०२.०७.२०२२ अनुसार रु. १४,५२,२८८.०६ | 20.01.2025 | Rs.12,86,000/- / Rs.1,28,600/- |
| | स्थावर मालमत्तेचे वर्णनः गाव नांदिवली तर्फे अंबरनाथ, तालुका – कल्याण जिल्हा ठाणे येथील सर्वे क्र. ५, हिस्सा क्र. १ येथे वसलेल्या माऊली पार्कच्या इमारत क्र. १ च्या तळ मजल्यावरील सदनिका क्र. ०५ चा सर्व खंड आणि भूखंड. जमिनीच्या सीमाः पूर्वः दुन्दा गणू आणि अन्य ह्यांची इमारत, पश्चिमः नारायण गोविंद आणि अन्य ह्यांची खुली जमीन, उत्तरः शनिवार दामू आणि अन्य ह्यांची खुली जमीन; दक्षिणः हरिचंद्र काथोड ह्यांची खुली जमीन. | | | | |
| 5 | 4412210090000001 / 4412- ठाणे | **१) शहाबुद्धीन फुल मोहमद अन्सारी, २) श्रीमती नूरजहां शहाबुद्धीन अन्सारी,** खोली क्र. ३८२, नदी नाका, म्हाडा कॉलनी, वाडा रोड, भिवंडी, ठाणे ४२१३०२ | ०४.०७.२०२२/ ०७.०६.२०२२ अनुसार रु. २१,९७,८४६.२४/- | 20.01.2025 | Rs.32,61,000/- / Rs.3,26,100/- |
| | स्थावर मालमत्तेचे वर्णन : युनिट क्र. २०७/ २, मोजमाप साधारणपणे १६८० चौ. फू. गार्डन मागे, दिल्ली दरबार ढाब्याजवळ, ऑफ नासिक रोड, धारण केलेला सर्वे क्र. २४/२, भिवंडी, गाव सावंढे, ठाणे ४२१३०२. | | | | |
| 6 | 4505210130000025 / 4505- विरार | **१)धर्मेश बाबा यादव, २) श्रीमती चंदा देवी धर्मेश यादव,** दोघेही येथे राहणारः सदनिका क्र. १०१, १ ला मजला, बोईसर, ता. पालघर बोईसर ता. पालघर ठाणे, महाराष्ट्र ४०१५०१ आणि येथे देखीलः खोली क्र. दांडी पाडा, यादव चाळ, साई नगर, शिगाव, महाराष्ट्र ४०१५०१ | ११.१०.२०२१ २९.०९.२०२१ अनुसार रु. २२,१९,८१०/- | 30.01.2025 | Rs.14,03,000/- / Rs.1,40,300/- |
| | स्थावर मालमत्तेचे वर्णन : सारवली, तालुका पालघर जिल्हा पालघर येथे वसलेल्या सर्वे क्र. ७, प्लॉट क्र. डी वर बांधण्यात आलेल्या त्रिवेदी नगर, एम श्री रामकृपा हाऊसिंग सोसायटी लि., म्हणून ज्ञात असलेल्या कॉंप्लेक्समधील विंग/ इमारत क्र. ०३ च्या २ ऱ्या मजल्यावरील ५५० चौ. फू बिल्टअप क्षेत्रफळ असलेली सदनिका क्र. १२ चा सर्व खंड आणि भूखंड. | | | | |
| 7 | 4416210080000002 / 4416- कल्याण | १)श्री. मोह. फराहीम खान, २) श्रीमती अन्वर जहान खान, दोघेही येथे राहणार सदनिका क्र. ४ एमएच क्र. ९६२/१९, शोएब अपार्टमेंट, न्यू गौरीपाडा, सर्वे क्र. ४३/१५, ४३/१६, ४४/२, ४५/१, प्लॉट क्र. १० गाव नारपोली, भिवंडी जिल्हा ठाणे महाराष्ट्र ४२१३०८ | ०३.०२.२०२० २३.१२.२०१९ अनुसार रु. ५,२०,४८७.०० | 22.02.2025 | Rs.10,18,000/- / Rs.1,01,800/- |
| | स्थावर मालमत्तेचे वर्णनः निवासी सदनिका क्र. ४, पहिला मजला, धारण केलेला एमएच क्र. ९६२/१९, शोएब अपार्टमेंट, न्यू गौरीपाडा, सर्वे क्र. ४३/१५, ४३/१६, ४४/२, ४५/१, प्लॉट क्र. १० गाव नारपोली, भिवंडी जिल्हा ठाणे चा सर्व खंड आणि भूखंड. सीमा पुढीलप्रमाणेः पूर्वः गल्ली, पश्चिमः पॅसेज, दक्षिण : रोड, उत्तरः ले आउट रोड. | | | | |
| 8 | 4411210130000516 / 4411- कोपरखैरणे | **१)मिनिता मनोहर खापणे, २) दिवाकर दत्तात्रय मुगुटराव** दोघेही येथे राहणारः खोली क्र. ००२, सुदामा सृष्टी कॉ-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि. (अपार्टमेंट), तळ मजला, नांदिवली टेकडी, बामणदेव रोड, डोंबिवली पूर्व, ठाणे महाराष्ट्र – ४२१२०१. १) आणि येथे देखीलः नांगरफळे, वाडी, दत्त मंदिराजवळ, प्रभानवल्ली, तालुका लांजा जिल्हा रत्नागिरी, ४१६७०१ आणि येथे देखीलः मे प्रिंट सोल्युशन्स, १ साफिराज सदन, प्लॉट क्र. ३६, वाशी रेल्वे स्टेशन जवळ, सानपाडा (पूर्व), नवी मुंबई ४००७०५ | २७.०३.२०२३ २१.०२.२०२३ अनुसार रु. २१,२१,१४८.८४ | 10.12.2024 | Rs.11,63,000/- / Rs.1,16,300/- |
| | स्थावर मालमत्तेचे वर्णनः नोंदणीकरण जिल्हा ठाणे, उप जिल्हा कल्याण मधील कल्याण डोंबिवली महानगरपालिका हद्दीमधील नोंदणीकरण जिल्हा ठाणे, गाव नांदिवली तर्फे पंचानंद, ता. कल्याण जिल्हा ठाणे येथे वसलेल्या एकूण २५०० चौ. मी. मोजमापाच्या जमिनीपैकी विकासासाठी वाटप करण्यात आलेल्या २५० चौ. मी. मोजमापाचा धारण केलेला सर्वे क्र. ७४, हिस्सा क्र. १ पार्ट, वर वसलेल्या नांदिवली, डोंबिवली पूर्व येथे वसलेल्या तळ + ५ (पाच) वरील मजले असलेल्या सुदामा सृष्टी च्या तळ मजल्यावरील ४०० चौ. फू. म्हणजेच ३७.१७ चौ. मी. बिल्ट अप क्षेत्रफळ असलेली सदनिका क्र. ००२. | | | | |
| 9 | 4505210130000020 & 4505210130000021 & 4505210130000019 / 4505- विरार | १)धरमचंद छगालाल हिंगड एस/ ओ : छगन लाल जी २) लक्ष्मी धरमचंद हिंगड, डी/ ओ लालू चव्हाण, दोघेही राहणारः सदनिका क्र. १०६, १ ला मजला, बी बिंग, ऋषभ कॉंप्लेक्स, बी पी रोड, गोड्देव नाका भाईंदर पूर्व, ठाणे महाराष्ट्र ४०११०७. १) येथे देखील : जेटपुरा राजसमंद, जेटपुरा, राजस्थान ३१३३२७ २) येथे देखीलः लोहगाव एलटी १, लोहगाव विजयपुरा कर्नाटक ५८६१०४ | ०६.१०.२०२२ १७.०९.२०२२ अनुसार रु. ३५,९७,५८०.७१ | 25.01.2025 | 1)Rs.6,30,000/- / Rs.63,000/- 2) Rs.6,30,000/- / Rs.63,000/- 3) Rs.6,30,000/- / Rs.63,000/- |
| | १) स्थावर मालमत्तेचे वर्णनः गाव बोईसर, ता. आणि जिल्हा पालघर येथे वसलेल्या किंवा साधारणपणे तसेच आणि इमारतीच्या रेखांकनामध्ये दाखविल्यानुसार जमिनीचा धारण केलेला एस. क्र. ४८ (जुना एस क्र. ७३/२), हिस्सा क्र. २, प्लॉट क्र. १५, वर वसलेल्या "साई धाम अपार्टमेंट" नामित इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील ४१९ चौ. फू. म्हणजेच ३८.९४ चौ. मी. बिल्टअप मोजमाप असलेल्या निवासी मालमत्तेचा धारण केलेला **सदनिका क्र. २०५.** | | | | |
| | २) स्थावर मालमत्तेचे वर्णनः गाव बोईसर, ता. आणि जिल्हा पालघर येथे वसलेल्या किंवा साधारणपणे तसेच आणि इमारतीच्या रेखांकनामध्ये दाखविल्यानुसार जमिनीचा धारण केलेला एस. क्र. ४८ (जुना एस क्र. ७३/२), हिस्सा क्र. २, प्लॉट क्र. १५, वर वसलेल्या "साई धाम अपार्टमेंट" नामित इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील ३१२.४५ चौ. फू. म्हणजेच २९.०३ चौ. मी. बिल्टअप मोजमाप असलेल्या निवासी मालमत्तेचा धारण केलेला **सदनिका क्र. २०६.** | | | | |
| | ३) स्थावर मालमत्तेचे वर्णनः गाव बोईसर, ता. आणि जिल्हा पालघर येथे वसलेल्या किंवा साधारणपणे तसेच आणि इमारतीच्या रेखांकनामध्ये दाखविल्यानुसार जमिनीचा धारण केलेला एस. क्र. ४८ (जुना एस क्र. ७३/२), हिस्सा क्र. २, प्लॉट क्र. १५, वर वसलेल्या "साई धाम अपार्टमेंट" नामित इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील ३१२.४५ चौ. फू. म्हणजेच २९.०३ चौ. मी. बिल्टअप मोजमाप असलेल्या निवासी मालमत्तेचा धारण केलेला **सदनिका क्र. २०७.** | | | | |

**मालमत्ता (मत्तां) च्या पाहणीचा दिनांक आणि वेळ :: ०२-०६-२०२५ आणि २०-०६-२०२५ रोजी स. ११ वा. ते सायं. ४ वा. दरम्यान**
**बोली आणि इरठेच्या सादरीकरणासाठी दिनांक :: २४.०६.२०२५ रोजी स. ११:०० वा ते सायं. ५:०० वा. दरम्यान**
**लिलावाचा दिनांक आणि वेळ :: २५-०६-२०२५ रोजी स. ११:०० वा ते दु. २:०० वा. दरम्यान**

इसारा रक्कम ठेव (इरठे) आयएनआर मध्ये ("उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि." च्या नावे डिमांड ड्राफ्टद्वारे भरावेत), बोली सादर करण्याचे आणि लिलावाचे ठिकाणः उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि. नानक अपार्टमेंट हॉटेल झायका च्या पुढे खडकपाडा सर्कल जवळ, कल्याण मुरबाड रोड, वायले नगर, कल्याण ४२१३०१ (अनु. क्र. १,२,३,४,५,६,७,८ आणि ९) संपर्क तपशीलः कृष्णा सिंगः ७७६७८४७५८४, भक्ती नेना : ९२२४४७१४९४.)

**अटी आणि शर्ती :** ई- लिलाव 'जसे आहे जिथे आहे' आणि 'जे आहे, ते आहे' तत्वावर घेण्यात येणार आहे.
१. प्राधिकृत अधिकारी यांच्या माहितीनुसार कोणत्याही मालमत्तेवर कोणत्याही स्वरूपाचा भार नाही. मात्र मालमत्तेचे हक्क, हक्क संबंध तसेच त्यावरील भार आदी यांची माहिती तसेच मालमत्तेच्या संदर्भातील दावे, हक्क देणी आदी यांची माहिती जाणून घेण्यासाठी इच्छूक खरेदीदार यांनी मालमत्तेच्या संदर्भात स्वतंत्र चौकशी बोली सादर करण्याच्या पूर्वी करावी. इ लिलावाची जाहिरात म्हणजे वचन किंवा बँकेचे प्रतिनिधीत्व नाही आणि असणार नाही. मालमता ही सध्याच्या आणि भविष्यातील भारांसह विक्री केली जात आहे जे बँकेला ज्ञात आहेत किंवा ज्ञात नाहीत. प्राधिकृत अधिकारी / संरक्षित धनको हे तृतीय पक्षकार यांचे हक्क, हक्क संबंध दावे अथवा देणी यांना जबाबदार असणार नाहीत.
२. बोली सादर करण्याच्या आधी मालमत्तेची चौकशी करणे आणि पाहणी करणे ही इच्छूक खरेदीदार यांची जबाबदारी आहे. लिलावासाठी ठेवण्यात आलेल्या मालमत्तांची पाहणी इच्छूक खरेदीदार यांना प्रत्येक मालमत्तेसमोर वरील प्रमाणे नमूद केलेल्या वेळेनुसार करता येईल.
३. इच्छूक खरेदीदार यांनी आपली बोली निम्नस्वाक्षरीकार यांच्याकडे वरील प्रमाणे नमूद केलेल्या लिलावाच्या तारखेच्या आधी एक दिवस सादर करणे आवश्यक आहे.
४. ई लिलाव उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक मान्यताप्राप्त ई-लिलाव सेवा पुरवठादार मे. सी 1 इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्याद्वारे करण्यात येईल. संपर्क व्यक्तीः प्रभाकरन एम - (मो क्र ७४१८२८१७०९). इच्छुक बोलीदारांना सल्ला देण्यात येत आहे की त्यांनी https://www.bankeauctions.com किंवा https://www.ujjivansfb.in/e-auctions ला भेट देऊन मालमत्तेचा तपशील जाणून घ्यावा आणि बोली प्रक्रियेत सहभाग घेण्यासाठी आपली नावे नोंदविण्यासाठी https://www.bankeauctions.com ला भेट द्यावी आणि युजर आयडी आणि पासवर्ड प्राप्त करून घ्यावा. इच्छुक खरेदीदार यांना ई लिलावाच्या संदर्भात ऑनलाईन प्रशिक्षण सेवा पुरवठादार मेसर्स सी १ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, हेल्प लाईन क्रमांक ७२९११९१८८२४, २५, २६ इ मेल आयडी support@bankeauctions.com, लिलाव पोर्टल https://www.bankeauctions.com येथे देण्यात येईल.
५.मालमत्तेची विक्री सर्वाधिक बोली सादर करणाऱ्याला करण्यात येईल मात्र ते संरक्षित धनको म्हणजेच उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड यांच्या मान्यतेस अधीन असेल. मात्र निम्नस्वाक्षरीकर यांना आवश्यकता भासल्यास इंटर से बिडिंग प्रक्रिया घेण्याचानिर्णय घेण्याची मुभा आहे. बोली स्वीकारण्याचा तसेच कोणतेही कारण न देता कोणतीही बोली / निविदा नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार याना आहे.
६.यशस्वी बोलीदार यांचे ईएमडी विक्री किमतीचा भाग म्हणून राखून ठेवले जाईल आणि अयशस्वी बोलीदार यांचे ईएमडी परत देण्यात येईल. ईएमडी रकमेवर कोणत्याही स्वरूपाचे व्याज दिले जाणार नाही. यशस्वी बोलीवर यांना विक्री किमतीच्या २५ % रक्कम ईएमडी ऍडजेस्ट करून प्राधिकृत अधिकारी यांच्याकडून बोली स्वीकारली गेल्यानंतर २४ तासांत अदा करणे आवश्यक आहे. आणि विक्री किमतीच्या उर्वरित ७५% रक्कम विक्री निश्चित झाल्याच्या १५ दिवसात किंवा परस्पर सहमतीने ठरलेल्या दिवशी जो तीन महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही, त्या दिवशी प्राधिकृत अधिकारी यांनी मान्य केल्यानुसार अदा करणे आवश्यक आहे. यशस्वी बोलीदार यांनी वरील प्रमाणे नमूद केलेल्या अनुसार रक्कम अदा केली नाही या आधीच भरणा केलेली रक्कम जप्त होण्यास पात्र असेल आणि मालमत्ता पुन्हा इ लिलावाद्वारे विक्रीसाठी ठेवण्यात येईल आणि थकीत खरेदीदार यांचा मालमत्तेवर कोणताही अधिकार किंवा दावा करता येणार नाही.
७. सदर प्रसिद्धी सूचना अमलबजावणी होणाऱ्या मुद्द्यांना अनुसरून आहे.
८. बोलीदारांनी आपल्या हितासाठी शेवटच्या क्षणी बोली लावणे टाळावे कारण खंडित वीज / खंडित इंटरनेट आदींसाठी उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक किंवा सेवा पुरवठादार जबाबदार असणार नाहीत अशा घटना टाळण्यासाठी बोलीदारांना आवाहन करण्यात येते आहे की त्यांनी पॉवर सप्लाय बॅक अप आदींची सोय करून ठेवावी. ज्यायोगे त्यांना लिलाव प्रक्रियेत विना अडथळा सहभाग घेता येणे शक्य होईल.
ही सूचना वरील प्रमाणे नमूद केलेले कर्जदार / हमीदार / तारण दार यांना तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीच्या वेळापत्रकाची सूचना आहे.

**ठिकाणः मुंबई दिनांक : १७.०५.२०२५**

सही/- प्राधिकृत अधिकारी, उज्जीवन स्मॉल फायनांस बँक